प्रेस नोट दिनांक १५/०४/२०१९

## खडकी येथे गांजा विकणारे इसमास दोन किलो गांजा सह गुन्हे शाखा, युनिट – ४, ने शिताफिने केली अटक.

---

लोकसभा निवडणुक २०१९ चे अनुषंगाने मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.शिरीष सरदेशपांडे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे -२, श्री. भानुप्रताप बर्गे यांनी अवैध धंदे व अमंली पदार्थाचे गैरव्यवहाराचे अनुषंगाने माहीती काढुन कारवाई करणेबाबत आदेशित केले होते.

मा.वरिष्ठांनी केले आदेशाचे अनुषंगाने दिनांक १५/४/२०१९ रोजी मा.पोलीस निरीक्षक श्री.अंजुम बागवान युनिट -४, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचे दिमतीत युनिट -४ चे अधिकारी व कर्मचारी असे खाजगी वाहनावरुन खडकी पोलीस स्टेशनचे हद्दीत अवैध धंदे व अमंली पदार्थाचे गैरव्यवहाराबाबत कारवाई करणेसाठी पेट्रोलींग फिरत असताना पो.हवा.राजु मचे व गणेश साळुंके यांना त्याचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की मरिआई माता मंदिर,रेंजहिल्स खडकी पुणे येथे रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे देविदास श्रीपती शिंदे वय ५० वर्षे रा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर झोपडपट्टी, रेजहिल्स रेल्वे लाईन जवळ, रेंजहिल्स खडकी पुणे हा मरिआई माता मंदिराजवळ लपुन छपुन आपले ओळखीचे लोकांना गांजा ची विक्री करीत आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी सदर भागात सापळा रचला असता सापळ्यामध्ये देविदास शिंदे हा हातात नायलॉनची पिशवी घेवुन चालत जाताना दिसल्याने त्यास हटकले असता तो तेथुन निघुन जावु लागल्याने त्याचे बाबत संशय बळावल्याने त्यास जागीच पकडुन त्याची झडती घेवुन नायलॉन पिशवीची पाहणी करता त्यामध्ये १ किलो ७२० ग्रॅम गांजा व रोख रक्कम ४००/- रु असा सर्व मिळुन ४२,९००/- रु कि.चा अमंली पदार्थ गांजा हा मिळुन आला आहे. तो जप्त करुन त्याचे विरुध्द पो.हवा. राजु मचे यांनी खडकी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने त्याबाबत खडकी पोलीस स्टेशन गु.र.नं. १५२/२०१९ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(ब) अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपीस अटक करणेत आलेली आहे.सदरचे आरोपीवर यापुर्वी सुध्दा खडकी पोलीस स्टेशन येथे चरस विक्रीचा गुन्हा नोंद आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे,श्री. शिरीष सरदेशपांडे, मा. सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-२, श्री.भानुप्रताप बर्गे, यांचे सुचने प्रमाणे पोलीस निरीक्षक, युनिट -४, गुन्हे शाखा,पुणे शहर श्री.अंजुम बागवान याचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक झंजाड,कर्मचारी राजु मचे, गणेश साळुंके, सचिन ढवळे, रमेश राठोड यांनी केलेली आहे.